# - प्रेस नोट -

दि. १०/०७/२०२६

## बांगुरनगर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. ०८/०७/२०२६ ते दि. ०९/०७/२०२६ रोजी २३:३० ते ०३:०० वा. च्या दरम्यान फिर्यादी श्री. सागर आनंद कदम, वय-३० वर्षे, धंदा-ड्रायव्हर, रा.ठी- गोरेगाव (प.), मुंबई यांना भगतसिंग नं १. नाका, न्यू लिंक रोड, गोरेगाव (प.) मुंबई येथे अटक आरोपी पुरुष वय-२५ वर्षे याने त्याचे व दुसरा इसम यांचे भांडण सोडविल्याचा राग मनात धरुन फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली व शिविगाळ करत तेथे उपस्थित लोकांना कोणी वाचवण्यास आल्यास जिवे ठार मारण्याची धमकी देऊन लोकांमध्ये दहशत निर्माण केली. तसेच फिर्यादी वर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने चाकुने हल्ला करुन फिर्यादीला गंभीर जखमी केले, म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.०९/०७/२०२६ रोजी गु.र.क्र. ४९७/२६, कलम१०९(१),१०९(२), ११८(१),३५१(३),३५२ बीएनएस २०२३,३७(१)(अ),१३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

----------------------